**सावली उन्हामध्ये अल्बम ः तुला पाहिले**

**गायक ः स्वप्निल बांदोडकर गीतकार ः चंद्रशेखर सानेकर संगीत ः चिनार महेश**

सावली उन्हामध्ये तशी तु माझ्या मनी
थेंब अलवार तु दवाचा
अबोली फुलामध्ये तशी तु माझ्या मनी
मोह बेधुंद तु मनाचा
विखरून चांदरात काळजात माझिया
मोहरे चेहरा तुझा
सावली उन्हामध्ये तशी तु माझ्या मनी
थेंब अलवार तु दवाचा

ही साद त्या तारकांची
हृदयी नक्षी तुझ्या रूपाची
टपटपतो मनी तुझाच मोगरा
तुझियासाठी होई जीव बावरा
विसरून या जगास आसपास मी तुझ्या
वाटतो आसरा तुझा
सावली उन्हामध्ये तशी तु माझ्या मनी
थेंब अलवार तु दवाचा

झुरतो झुलतो सदा थरारे
जीव हा माझा तुला पुकारे
ये दाटुनी ओथंबुनी
विरही सर ही या जीवनी
भिजवूनी जा अशीच जीवनास माझिया
लागु दे तुझी तृषा
सावली उन्हामध्ये तशी तु माझ्या मनी
थेंब अलवार तु दवाचा